दुरध्वनी क्र.- ☎(0721)2551001
फॅक्स क्र. - 🖷 (0721)2551010
ई मेल - (cp.amravati@mahapolice.gov.in)

**पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर**
**मालटेकडी रोड, कॅम्प-अमरावती** 444602

2005

क्रमांक : पोआअश/पशा-प्रलि/वि.अ. भरती /लेखी परिक्षा/२०२४ अमरावती शहर **दि. :-** २२/०५/२०२४

2 4 MAY 2024

# -- सुचनापत्र --

**विषय** :- विधी अधिकारी गट - ब व विधी अधिकारी यांचे रिक्त पदे 11 महिन्याकरीता कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता उमेदवारांची एकत्रितरित्या **लेखा परिक्षा व तोंडी परिक्षा दिनांक 08/06/2024 रोजी घेण्यात येणार असलेबाबत.**

---000---

पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आस्थापनेवरील विधी अधिकारी गट - ब चे 01 पद व विधी अधिकारी यांची 03 पदे अशी एकुण 04 पदे ही कंत्राटी पध्दतीने 11 महिन्याकरीता भरण्याबाबत उमेदवार यांचेकडून अर्ज मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने विधी अधिकारी गट - ब व विधी अधिकारी या पदाकरीता प्राप्त अर्जानुसार सदर उमेदवार यांची लेखी परिक्षा ही **पोलीस आयुक्त कार्यालय, मालटेकडी रोड, अमरावती** येथे दिनांक 08/06/2024 रोजी घेण्यात येणार आहे. सदर **परिक्षेचे स्वरुप, परिक्षा केंद्राचे ठिकाण व वेळ खालीलप्रमाणे ठेवण्यात आली आहे.**

(1) **विधी अधिकारी गट -ब व विधी अधिकारी यांचे पदाकरीता स्वतंत्र लेखी परिक्षे ऐवजी दोन्ही पदाकरीता एकच लेखी परिक्षा घेण्यात येणार आहे.**

(2) **विधी अधिकारी गट -ब व विधी अधिकारी या दोन्ही पदाकरीता लेखी परिक्षा ही दिनांक 08/06/2024 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी ०१.००या वेळेत पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथील दुसरा मजला, मिटींग हॉल येथे घेण्यात येईल.**

(3) **लेखी परिक्षा व तोंडी परिक्षा यामध्ये प्राप्त एकत्रित गुणांनुसार , गुणवत्तेनुसार प्रथम विधी अधिकारी गट ब या पदावर नेमणुक देण्यात येईल व उर्वरित गुणवत्तेनुसार येणारे उमेदवार यांना विधी अधिकारी या पदावर नेमणुक देण्यात येईल.**

(4) **सर्व उमेदवार यांची तोंडी परिक्षा ही दिनांक 08/06/2024 रोजी दुपारी 03.00 ते सायंकाळी 06.00 या वेळेत पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथील दुसरा मजला, मिटींग हॉल येथे घेण्यात येईल. सर्व उमेदवार यांनी आपले सर्व मुळ शैक्षणिक गुणपत्रिका, प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत.**

(5) **उमेदवार यांना लेखी परिक्षेकरीता या कार्यालयाकडून प्रवेशपत्र दिनांक 07/06/2024 रोजी पासुन कार्यालयीन वेळेत प्रमुख लिपीक, पत्रव्यवहार शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांचेकडून तसेच परिक्षेच्या दिवशी म्हणजेच दिनांक 08/06/2024 रोजी सकाळी 09.00 वाजता पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथील दुसरा मजला, मिटींग हॉल, येथून प्राप्त करुन घ्यावीत.**

(6) **प्रवेश पत्र घेण्याकरीता उमेदवार यांनी त्यांचे आधारकार्डची मुळ प्रत तसेच एक झेरॉक्स प्रत सोबत आणावी. त्याशिवाय आपणास प्रवेशपत्र देण्यात येणार नाही. लेखी परिक्षेकरीता परिक्षा हॉलमध्ये सकाळी 10.00 वाजता उपस्थित रहावे. परिक्षेचे प्रवेशपत्र असल्याशिवाय उमेदवार यांना लेखी परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही , याची नोंद घ्यावी.**

**उपरोक्त नमुद केलेप्रमाणे झालेल्या बदलांची सर्व उमेदवार यांनी नोंद घ्यावी.**

विधी अधिकारी गट - ब व विधी अधिकारी या पदाचे भरतीचे संबंधात वेळोवेळी अदयावत माहिती पोलीस आयुक्त, अमरावती शहर या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या वेबसाईड वरील Flash या Tab वर उपलब्ध करुन देण्यात येईल, त्याचे उमेदवार यांनी नोंद घ्यावी.

**( नविनचंद्र रेड्डी )**
पोलीस आयुक्त, अमरावती शहर